# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


| तक्रार क्रमांक-१५१/२०२३/जळगांव<br>व्दितीय अपील क्र.- ३४७८/२०१९/जळगांव | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | |
| १. | श्री.दिपक युवराज जाधव,रा.मु.पो.म्हसावद,ता.जि.जळगांव | तक्रारदार |
| | विरूद्ध | |
| १. | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव, ता.जि.जळगांव. | उत्तरवादी क्र.१ |
| २. | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव, ता.जि.जळगांव. | उत्तरवादी क्र.२ |

(निर्णय दिनांक ०२/०७/२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक १५/०२/२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) नुसार तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.आयोगाने व्दितीय अपील क्र.- ३४७८/२०१९/जळगांव संदर्भात दिनांक २२/१०/२०२० रोजी झालेल्या सुनावणीअंती आदेश पारीत केलेले आहेत. तथापि, सदर आदेशानुसार घोषित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव,ता.जि.जळगांव यांनी कोणतीही कार्यवाही केली नसून, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याची तक्रार तक्रारदार यांनी आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणांवर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध अभिलेखावरुन आयोगास असे निदर्शनास येते की,आयोगाने व्दितीय अपील क्र.- ३४७८/२०१९/जळगांव संदर्भात दिनांक २२/१०/२०२० रोजी झालेल्या सुनावणीअंती पारीत केलेल्या आदेशांनुसार जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव,ता.जि.जळगांव यांनी सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने व्दितीय अपील क्र.- ३४७८/२०१९/जळगांव संदर्भात दिनांक २२/१०/२०२० रोजी झालेल्या सुनावणीअंती पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी.उप मुख्य कार्यकारी अधिकारी-शिक्षण विभाग, जिल्हा परीषद कार्यालय,जळगांव,ता.जि.जळगांव यांना आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह तक्रार क्र. **१५१/२०२३/जळगांव** अंतिमतः निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

---

तक्रार क्रमांक-**१५१/२०२३/जळगांव** /जावक क्र. ८४३९ दिनांक- ०६/०५/२०२६

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद कार्यालय,जळगांव,ता.जि.जळगांव
२)उपमुख्य कार्यकारी अधिकारी-शिक्षण विभाग,जिल्हा परीषद कार्यालय,जळगांव, ता.जि.जळगांव
३) निवडनस्ती.